कोचिंग नेशन

एकीकडे केंद्र सरकारने खासगी कोचिंग क्लासवर निर्बंध लादले असताना आपली व्यवस्थाच कोचिंग क्लासच्या मार्केटला उत्तेजन देत आहे. कोणत्याही देशाचा विकास मुख्यत्वे त्या देशाच्या शिक्षण पद्धतीवर अवलंबून असतो आणि सध्याच्या काळात भारतातील शिक्षणाचा स्तर वर्षानुवर्षे घसरत आहे. जगातील पहिल्या शंभर विद्यापीठात भारतातील एकही विद्यापीठ नाही, याची जागतिक महासत्ता होण्याची स्वप्ने पाहणाऱ्यांना जराही चिंता वाटत नाही.

'शिक्षणाच्या बाबतीत वेगवेगळे प्रयोग करायचे, अभ्यासातून काय वगळायचे आणि काय ठेवायचे याची जेवढी चिंता 'एनसीईआरटी'ला आहे, तेवढी चिंता शैक्षणिक स्तर उंचवावा याची नाही. शिक्षकांना शाळाबाह्य कामे करायला लावायची आणि त्यांच्याकडून गुणवत्तेची अपेक्षा करायची, हे जसे चुकीचे आहे, तसेच उरलेल्या वेळेत शिक्षक किती मनापासून शिकवतात, हे ही महत्त्वाचे आहे. 'असर' या संस्थेच्या दोन जिल्ह्यांच्या पाहणीवरून ते सार्वत्रिक चित्र नाही, असे सांगण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी षिक्षणाचा घसरणारा दर्जा ही चिंतेची बाब आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या धक्कादायक अहवालाचा अभ्यास केला असता सरकारी शाळांमधील शिक्षणाचा स्तर घसरत असल्याचे दिसून येते. एकीकडे काही ठिकाणी खासगी शाळांतून मुलांना काढून घेऊन जिल्हा परिषदांच्या शाळांत घालण्याकडे कल असताना हा अहवाल पुन्हा सरकारी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या दर्जावर प्रश्न उपस्थित करतो. अहवालानुसार, पश्चिम बंगाल, बिहार, ओडिशा यांसारख्या अनेक राज्यांच्या सरकारी शाळांमध्ये शिकणाऱ्या बहुतांश विद्यार्थ्यांना खासगी प्रशिक्षण घेण्याची गरज आहे. म्हणजेच, भारतातील अनेक ग्रामीण भाग आहेत, जेथे सरकारी शाळांमधील शिक्षणाची स्थिती इतकी वाईट आहे, तिथे पालकांना त्यांच्या मुलांच्या चांगल्या भविष्यासाठी वेगळे कोचिंग घ्यावे लागते. आता 'असर'च्या आणखी एक अहवालानुसार, देशातील १४ ते १८ वर्षे वयोगटातील एक चतुर्थांश मुलांना त्यांच्या प्रादेशिक भाषांमधील द्वितीय श्रेणीचे अध्यायही वाचता येत नाहीत. 'असर २०२३ बियाँड बेसिक'च्या सर्वेक्षणात २६ राज्यांतील १४-१८ वयोगटातील ३४ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले.'

या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे, की सहभागी असलेल्या ५६ टक्के विद्यार्थ्यांना इंग्रजीतील एक वाक्यही वाचता येत नाही. नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत केंद्र आणि राज्य सरकारने डिजिटल शिक्षणाला प्रोत्साहन दिले होते; पण या अहवालानुसार, आजची मुले अभ्यासापेक्षा मनोरंजनासाठी स्मार्टफोनचा अधिक वापर करत आहेत. सर्वेक्षणात समाविष्ट करण्यात आलेली १४ ते १८ वर्षे वयोगटातील ९१ टक्के मुले 'सोशल मीडिया'वर सक्रिय आहेत. 'असर'च्या अहवालानुसार, स्मार्टफोनची समस्या केवळ शहरी भागातील विद्यार्थ्यांपुरती मर्यादित नाही. ग्रामीण भागातही त्याचा वापर वाढला आहे. या सर्वेक्षणात समाविष्ट असलेल्या ग्रामीण भागातील ९५ टक्के कुटुंबांकडे स्मार्टफोन होते आणि सुमारे ९० टक्के महिला आणि ९५ टक्के पुरुष ते वापरू शकतात. 'असर'च्या अहवालात ग्रामीण भारतातील जिल्हे आणि राज्यांमधील शालेय शिक्षण आणि मुलांच्या मूलभूत शिक्षणाची स्थिती तपासली आहे. २००५ पासून देशातील सर्व ग्रामीण भागात दरवर्षी सर्वेक्षण केले जाते. हे भारतातील सर्वात मोठे सर्वेक्षण आहे. अहवालानुसार, भारतातील १४-१८ वर्षे वयोगटातील ८६.८ टक्के मुले कोणत्या ना कोणत्या शैक्षणिक संस्थेत नोंदणीकृत आहेत. तथापि, या मुलांची नोंदणी टक्केवारी वयोमानानुसार कमी होते. इतकेच नाही, तर इयत्ता ११ वी आणि १२वीच्या ५५ टक्क्यांहून अधिक विद्यार्थी कला शाखेची निवड करतात. त्यानंतर द्वितीय क्रमांक विज्ञान शाखेचा आणि तृतीय क्रमांक वाणिज्य शाखेचा आहे. 'असर'च्या अहवालात असे स्पष्ट झाले आहे, की विज्ञान तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या विषयांमध्ये मुलींची नोंदणी मुलांच्या नोंदणीपेक्षा कमी आहे. अहवालानुसार, ग्रामीण भारतातील बदलत्या सामाजिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुलींना महाविद्यालयीन स्तरापर्यंत शिक्षण घेण्याची संधी वाढली आहे. गरीब घरातील मुलांना लवकरात लवकर पैसे कमवण्याची इच्छा असते आणि घरात पैसे नसल्यामुळे मुले शाळेची फी भरण्यासाठी कामाला लागतात, असेही सर्वेक्षणातून पुढे आले आहे. 'असर'च्या अहवालात असे दिसून आले आहे, की इयत्ता ११ मधील विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित विषय निवडण्यासाठी मुलांपेक्षा मुलींची शक्यता खूपच कमी आहे. सर्वेक्षणानुसार, २८.१ टक्के मुली कला प्रवाहात शिकतात, तर ३६.३ टक्के मुले विज्ञान, तंत्रज्ञान प्रवाहाची निवड करतात. या अहवालात काही धक्कादायक तथ्ये उघड झाली आहेत. या अहवालानुसार, या सर्वेक्षणात प्राथमिक वर्ग असलेल्या १७ हजार दोन सरकारी शाळांचे निरीक्षण केले होते. त्यापैकी नऊ हजार ५७७ प्राथमिक शाळेतील विद्यार्थी आणि सात हजार ४२५ उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थी होते. पहिलीच्या वर्गातील मुलांना गणिताची प्राथमिक कौशल्ये समजण्यात अडचण येत होती.

एवढेच नाही तर पहिली, दुसरी आणि तिसरीच्या मुलांना अक्षरेही समजण्यास त्रास होत होता. त्याचप्रमाणे सरकारी शाळांमधील शिक्षणाचा दर्जा इतका खराब आहे, की मुलांना वेगळी शिकवणी घ्यावी लागते, असे या अहवालात म्हटले आहे. गेल्या चार वर्षात सरकारी शाळांमधील नावनोंदणीत झपाट्याने वाढ झाली आहे. २०१८ मध्ये ६५.६ टक्के नावनोंदणी होती, तर २०२२ पर्यंत ती ७२.९ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. शिक्षणाचा दर्जा घसरत असताना पालकांचा खासगी कोचिंग क्लासकडे कल वाढला आहे. तिथे लूट होते. त्यावर केंद्र सरकारने काही निर्बंध घातले आहेत. असे असताना शिक्षणाचा खालावलेला दर्जा आणि पालकांना वैयक्तिक लक्ष देण्यात येणाऱ्या अडचणी यामुळे खासगी कोचिंग क्लासची बाजारपेठ विस्तारत आहेत. सरकारची बंधने आल्यानंतर त्यातून पळवाटा काढण्याचा प्रयत्न खासगी कोचिंग क्लास चालकांनी केला आहे. दोन दशकांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांचे म्हणणे आहे, की आता खासगी कोचिंग क्लास चालक मुलांना ग्राहक समजतात. मुलांना सातवी-आठवीपासूनच कोचिंग मार्केटमध्ये प्रोजेक्टसारखे सोडले जाते. आता हा कोचिंग उद्योग इतका वाढला आहे, की इथला विद्यार्थी हा ग्राहकाशिवाय उरला नाही.

सरकारने कोचिंग संस्थांसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. या मार्गदर्शक तत्त्वानुसार, आता कोचिंग संस्थांना लहान वयापासून मुलांना प्रवेश देता येणार नाही. याशिवाय फी नियंत्रण आणि मानसिक आरोग्यालाही प्राधान्य देण्यात आले आहे.

सरकारने कोचिंग सेंटर्सवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. आता मुले जेव्हा मोठी होऊन स्वतःचे निर्णय घेऊ लागतात, तेव्हा त्यांना काय व्हायचेय आणि काय नाही हे जाणून घेऊनच त्यांनी कोचिंग क्लास निवडावेत. हा उद्देश कितीही चांगला असला, तरी येथे केजीपासून खासगी कोचिंग क्लासचे फॅड आले आहे. कोचिंग मार्केट आता खोलवर रुजले आहे. आजकाल हा हजारो कोटींचा उद्योग झाला आहे. येत्या काळात त्यांना या मार्गदर्शक तत्त्वांचा पर्याय सापडेल, तरीही ते ज्या पद्धतीने मुक्तहस्ते व्यवसाय करीत होते, त्यावर काही बंधने येतील. ज्या पद्धतीने मुलांना 'रँकर' आणि 'बँकर' या वर्गात विभागून कोचिंगमध्ये शिकवले जात होते, ती भेदभावाची वृत्ती आता बदलणार आहे. ते रँकर्सवर म्हणजे टॉपर्सवर लक्ष केंद्रित करायचे आणि फक्त बँकर्सकडून पैसे कमवायचे, आता हे चांगले आहे की मुले ज्या दिवसांचा अभ्यास करतात, त्या दिवसांसाठी फक्त ती फी घेतली जाईल आणि बाकीची फी त्यांना परत केली जाईल. असे असले, तरी कोचिंग एजंट आणि दलालांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने मार्गदर्शक तत्त्वांमध्ये काही मुद्दे द्यायला हवे होते.

मार्गदर्शक तत्त्वांचे योग्य पालन केले तरच ते प्रभावी होतील. मार्गदर्शक तत्त्वे खूप चांगली आहेत; परंतु प्रत्येकाने त्यांचे शब्दशः आणि काटेकोरपणे पालन केले तरच ती उपयुक्त ठरतील. लहान मुलांचे पालक एकदा या कोचिंग सेंटरच्या जाळ्यात सापडले, की त्यांची मुले मोठी होईपर्यंत त्यांचे सर्व काही लुटले जाते. या मार्गदर्शक तत्त्वांनंतरही कोचिंग सेंटर्सच्या पद्धतीत फारसा बदल होणार नाही, हा उद्योग फक्त आपली पद्धत बदलेल. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये असे म्हटले आहे, की जर त्यांनी मानसिक आरोग्य सल्लागार ठेवले तर ते निश्चितपणे कोचिंगची सुविधा ठेवतील. तसे करून पळवाट काढण्याची सोय सरकारनेच उपलब्ध करून दिली आहे.

पन्हाळगडावर अस्ताव्यस्त पार्कींगमुळे नागरीक त्रस्त पोलीस व नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष

राजदंड न्युज नेटवर्क

पन्हाळा : पन्हाळागडावर शासकीय कामाच्या निमित्ताने तालुक्यातील विविध गावातील दररोज शेकडो लोक पन्हाळ्यावर येतात त्यांची दुचाकी व चारचाकी वाहने आस्ताव्यस्तपणे लावली जात आहेत पन्हाळा शहरातील बाजीप्रभू पुतळा ते एसटी स्टँड रस्त्यावर कोठेही वाहने थांबविली जात असल्याने वाहतुकीस अडथळा होत आहे. वाहनांचे वाढते अतिक्रमण व अस्ताव्यस्तपणा हा चिंतनाचा विषय बनला आहे. पन्हाळा पोलीस आणी नगरपरिषद यांचे थांबलेल्या वाहनांकडे दुर्लक्ष होत आहे नगरपरिषदेचे ताराराणी मार्केटमध्ये व्यावसायिक दुकाने आहेत जवळच बँकेची शाखा आहे प्रांत कार्यालय, नगरभुमापन,सहकार कार्यालय आहे या ठिकाणी दुचाकी, चारचाकी वाहने दिवसभर थांबुन असतात याच परिसरात बहुतेक कार्यालये आहेत प्रामुख्याने पोलिस ठाणे, बँक, तहसीलदार, वनविभाग, तलाठी व मंडल अधिकारी कार्यालय असल्याने याठिकाणी तर जादा वाहने थांबलेली असतात पोलिस वाहनांवर कारवाई करत नाहीत पोलिसांचे लक्ष नाही. दुय्यम निबंधक कार्यालय ते एसटी स्टँड रस्ता जवळपास एकेरी वाहतुकीचा असल्याने या रस्त्यावर तर चालणे सुद्धा मुष्किल होते आहे दिवसभर वाहने थांबल्यामुळे पादचाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. तसेच हा संपुर्ण मुख्य रस्ता असल्याने या मार्गावर एसटी वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे इतर वाहने चालवताना ही थांबलेली वाहने अडथळा ठरत आहेत. पोलिस शहराबाहेर बुधवार पेठ किंवा नाका येथे कांहीं घटना अथवा बातमी आली की वाहनांची तपासणी करतात खरतर बाजार बाग अथवा संस्कृती हॉल समोरील जागेत वाहनतळ उपलब्ध आहे तेथे वाहने पोलीस व नगरपरिषद यांनी संयुक्तपणे काम करत वाहने लावण्याची वाहनधारकांना सवय लावली तर ही समस्या कायमची नष्ट होईल. रस्त्यांवर वाहनांचे अतिक्रमण हटवून वाहतूक सुरळित करावी अशी मागणी जनतेतून केली जात आहे.

पन्हाळा पोलीस ठाण्या समोर अस्ताव्यस्त पार्किंग मुळे मुख्य मार्गावर एसटी वाहतुकीला अडथळा निर्माण झाला

नियमित पाणी पट्टी घर पट्टी भरणाऱ्याना उंबर्डे ग्रामपंचायतीची सप्रेम भेट : ग्रामपंचायतीच्यावतीने जार वाटप

उंबर्डे ता खटाव येथे ग्रामपंचायतीच्या वतीने जार वाटप करण्यात आले यावेळी प्रमुख पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

वडूज : उंबर्डे ता खटाव येथील ग्रामपंचायतीच्या वतीने नवीन फंडा काढण्यात आला आहे . नियमित पाणी पट्टी, घरपट्टी भरणाऱ्या सभासदांना चक्क जार वाटप करण्यात आले आहेत. विशेषतः या त्यांच्या योजनेमुळे गावातील अनेक थकीत घरपट्टी आणि पाणी पट्टी असणाऱ्या सभासदांनी आपली थकीत रक्कम भरून ग्रामपंचायतीला सहकार्य केले आहे. यामुळे ग्रामपंचायतीची वसुली चांगल्या प्रकारे झाली असल्याचे सरपंच रुपाली राजेंद्र पवार, उपसरपंच संभाजी शिवाजी पवार, व ग्रामसेवक अमोल माने यांनी सांगितले.

याबाबत अधिक माहिती अशी की उंबर्डे ता खटाव येथील ग्रामपंचायतीने गावात जे ग्रामस्थ पाणी पट्टी व घरपट्टी नियमित भरतात अशा नागरिकांना मोफत जार वाटप केले. तर मागवासवर्गीय १५ टक्के निधीतून टोप वाटप करण्यात आले. यामुळे नागरिकांनी मोठ्या उत्सहाने ग्रामपंचायत प्रशासनाला सहकार्य करत थकीत रक्कम भरली. यामुळे ग्रामपंचायतीची वसुली ही चांगल्या प्रकारे झाली. यावेळी ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिरोळात मतदार जनजागृतीसाठी पालिकेकडून विविध उपक्रमाचे आयोजन

शिरोळ : आगामी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदान करावे यासाठी निवडणुक आयोगाच्या सुचनेनुसार मतदार जनजागृतीकरीता शिरोळ शहरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले

भारत निवडणूक आयोगाकडुन पुरस्कृत केलेल्या फ कार्यक्रमांतर्गत शिरोळ नगरपरिषदेकडुन शिरोळ शहरामध्ये मतदारांमध्ये जनजागृती करणेकरीता विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये शहरामध्ये मतदान जनजागृतीचे पोस्टर्स प्रदर्शित करून, महाविद्यालयीन विद्यार्थी, शालेय विद्यार्थी, नागरिक, नगरपरिषद कर्मचारी यांचे सहभागाने शहरात प्रभात फेरी, सायकल रॅली काढुन जनजागृती केली. शहरातील आठवडी बाजार, मुख्य बाजारपेठ येथे पोस्टर्स लावुन मतदारांमध्ये जनजागृती केली.

तसेच महाविद्यालयांमध्ये नवमतदार नोंदणी करणेकरीता मागदर्शन करण्यात आले. सदर उपक्रम पार पाडण्यासाठी पालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी निशिकांत प्रचंडराव यांच्या मागदर्शनाखाली प्रशासकीय अधिकारी लक्ष्मण लोंढे, कर निरीक्षक चंद्रकांत पाटील, नगर अभियंता श्रीधर डुबुले, लेखपाल हरीपांडू कामुन, कर निरीक्षक अश्विनी पाटील, कार्यालय अधीक्षक, संदिप चुडमुंगे, लिपिक अमोल बन्ने व नगरपरिषद कर्मचारी यांनी यशस्वीरित्या पार पाडले.

अजित पवार गटाच्या महिला राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्षपदी सौ स्नेहल शिंदे यांची निवड

शिरोळ : उपमुख्यमंत्री अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडीच्या कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्षपदी शिरोळच्या सौ स्नेहल अमरसिंह शिंदे यांची निवड करण्यात आली आहे राज्याचे वैद्यकीय शिक्षण आणि कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते व पक्षाचे प्रमुख पदाधिकारी मान्यवर यांच्या उपस्थितीत सौ शिंदे यांना निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले

शिरोळच्या माजी उपनगराध्यक्षा सौ कमलाताई शिंदे यांच्या सुनबाई सौ स्नेहल शिंदे यांचे सामाजिक व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला आघाडीच्या कोल्हापूर जिल्हाध्यक्षा सौ शितल फराकटे यांनी त्यांची महिला आघाडीच्या कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड केली आहे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते निवड पत्र देण्यात आले यावेळी माजी आमदार के पी पाटील शितल फराकटे शिरोळचे माजी नगराध्यक्ष अमरसिंह पाटील शिरोळचे माजी उपसरपंच प्रताप उर्फ बाबा पाटील सौ कमलाबाई शिंदे नृसिंहवाडीचे माजी ग्रामपंचायत सदस्य अभिजीत जगदाळे कृष्णराव शिंदे युवा नेते अमरसिंह शिंदे सरीता चुडमुगे माधुरी चुडमुगे बाळाबाई चुडमुगे आश्विन माळी शिल्पा महात्मे. उज्वला आवळे भाग्यश्री बल्लारी . सीमा माळी सुजाता आवळे. स्मिता कुन्नूरे बाबुताई मरळे रूपाली भोसले. सुनंदा माळी सुजाता माळी . मनीषा जाधव. तृप्ती पाटील . अश्विनी माळी . राजमुद्रा पाटील. स्मिता माळी . प्रयांका गावडे. कल्पना कांबळे. मनीषा होवळे. अश्विनी कांबळे . गायत्री केगारे अश्विनी केंगारे रूपाली हेरवाडे जोया नदाफ. ज्योती उपार होनमोरे ताई . स्नेहल आवळे. यांच्यासह सर्व बचत गटाच्या अध्यक्षा सचिव आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कल्पद्रुम ग्रामीण बिगर शेती पत संस्थेच्या शिरोळ शाखेचा मंगळवारी शुभारंभ

शिरोळ : कल्पद्रुम ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था (हसूर) या संस्थेच्या शिरोळ शाखेचा शुभारंभ गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मंगळवारी (दि ९) सकाळी १० वाजता समर्थ मंगल कार्यालयासमोरील इमारतीत होणार आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन नेमगोंडा रावसाहेब पाटील यांनी दिली.

ते म्हणाले , शिरोळ शहरातील ग्राहक , ठेवीदार व सभासदांची मागणी असल्याने हसुर (ता शिरोळ)येथील कल्पद्रुम ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची शिरोळ येथे तिसरी शाखा सुरू होत आहे. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे राष्ट्रीय अध्यक्ष रावसाहेब देसाई यांच्या हस्ते शाखेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. यावेळी माजी आमदार उल्हास पाटील , नियोजन मंडळाचे सदस्य दलितमित्र अशोकराव माने , शिरोळचे माजी नगराध्यक्ष अमरसिंह पाटील , जयसिंगपूरचे माजी नगराध्यक्ष संजय पाटील - यड्रावकर ,श्री दत्त साखर कारखान्याचे संचालक अनिलराव यादव , स्वाभिमानी विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष सौरभ शेट्टी ,मार्केट कमिटीचे माजी अध्यक्ष सुभाषसिंग राजपूत , शिरोळ तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष पांडुरंग उर्फ अविनाश माने यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे . यावेळी सामाजिक सहकार शैक्षणिक क्रीडा व उद्योग - व्यवसाय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कल्पद्रुम ग्रामीण पतसंस्थेने सामान्य नागरिक यासह व्यापारी ,उद्योजक आदिना चांगला कर्ज पुरवठा केला आहे आर्थिक दृष्ट्या सक्षम करून वेगवेगळ्या योजनेतून कर्जरूपाने त्यांना मदत केली आहे . ठेवी व ठेवीवरील आकर्षक व्याज दर यासह विविध योजना राबवून संस्था सभासदांचे हित जोपासत आहे . शहरीसह ग्रामीण भागात कल्पद्रुम ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेला नागरिकातून चांगला प्रतिसाद मिळत असून कल्पद्रुम पत संस्थेच्या शिरोळ शाखा शुभारंभ प्रसंगी सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहनही त्यांनी केले आहे. यावेळी कल्पद्रुम पत संस्थेचे व्हाईस चेअरमन दिलीप चौगुले , मॅनेजर संजय पाटील , शिरोळ चे शाखाधिकारी अनुपम चौगुले आदी उपस्थित होते.

महायुतीतर्फे नव्या चेहऱ्याचा शोध; नाशिकमध्ये वाद टाळण्याचा प्रयत्न; जागा कोणत्या पक्षाला जाणार हे अस्पष्टच

नाशिक : तीनही पक्षांची दावेदारी आणि आरोप-प्रत्यारोपांमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या नाशिक लोकसभेच्या जागेवर महायुतीने आता वादरहित नवा चेहरा शोधण्याचे काम हाती घेतले आहे. शिवसेना शिंदे गटाच्या ताब्यातील जागेसाठी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मंत्री तथा ओबीसी नेते छगन भुजबळ यांचे नाव लावून धरले होते. या नावाविषयी केवळ शिंदे गटच नव्हे तर, भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वर्तुळातून नकारात्मक सूर उमटला. यामुळे अखेरीस नवीन चेहरा मैदानात उतरविण्याच्या विचाराप्रत नेतेमंडळी आली आहे.

महाविकास आघाडीने नाशिकच्या जागेसाठी ठाकरे गटाचे माजी आमदार राजाभाऊ वाजे यांचे नाव १२ दिवसांपूर्वीच जाहीर केले. ते प्रचाराला लागले असताना महायुतीला अजूनही उमेदवार ठरवता आलेला नाही. शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी कित्येक दिवस मुंबईत तळ ठोकूनही प्रगती झाली नाही. याच कालावधीत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांचे नाव दिल्लीतून भाजप नेत्यांनी निश्चित केल्याची माहिती समोर आल्यावर वादाने नवीन वळण घेतले. शिंदे गटाला जागा देण्यास उघडपणे विरोध करणाऱ्या भाजप पदाधिकाऱ्यांनी भुजबळांना सुप्त विरोध केला. ब्राह्मण महासंघाने त्यांच्या उमेदवारीला आक्षेप घेतला. सकल मराठा समाजाने भुजबळांना उमेदवारी दिल्यास त्याचे परिणाम महायुतीला सर्वत्र भोगावे लागतील, असा इशारा दिला.

या घडामोडीत तीनही पक्षांतील कार्यकर्त्यांमध्ये परस्परांविषयी तेढ निर्माण झाली. नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणात भुजबळ यांच्या नावाविषयी नकारात्मक प्रतिक्रिया समोर आल्याचे भाजपच्या वरिष्ठ नेत्याने सांगितले. लोकसभेची प्रत्येक जागा महत्त्वाची असल्याने महायुतीने वादविरहित नव्या चेहऱ्याची पडताळणी सुरू केली असून शिंदे गट, भाजप आणि अजित पवार गटातील अशा काही नावांची चाचपणी होत आहे. लवकरच हे काम पूर्ण होईल. त्यातील कल लक्षात घेऊन नाशिकच्या जागेवर महायुतीतर्फे नवीन उमेदवार निश्चित करण्याचे धोरण वरिष्ठांनी स्वीकारले आहे, असे शिंदे गटाच्या नेत्याकडून सांगण्यात आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

अमरावतीत पुन्हा ट्विस्ट; आनंदराज आंबेडकर यांचा निवडणूक लढण्याचा निर्णय

अमरावती : उमेदवारी अर्ज भरून माघारीची घोषणा केल्यानंतर नवीन घटनाक्रमात रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी अखेर अमरावती लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे. येथील पत्रकार परिषदेत आनंदराज आंबेडकर यांनी निवडणूक लढण्याची घोषणा केली. वंचित बहुजन आघाडी, एमआयएम आणि इतर मित्र पक्षांचा आपल्याला पाठिंबा असल्याचा दावा त्यांनी केला.

आनंदराज आंबेडकर यांनी गेल्या २ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. पण, वंचित बहुजन आघाडीने त्यांना पाठिंबा जाहीर करण्यास उशीर केल्याने त्यांनी निवडणुकीतून माघार घेण्याची घोषणा केली होती. ४ एप्रिलला वंचित बहुजन आघाडीने उमेदवार रिंगणात न उतरविण्याचा निर्णय घेऊन आनंदराज आंबेडकर यांना पाठिंबा जाहीर केला. तरीही आनंदराज आंबेडकर हे नाराज होते. आपल्या नामांकन रॅलीत वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी सहभागी होऊ नये, यासाठी प्रदेश पदाधिकाऱ्यांनी तंबी दिल्याचा आरोपही आंबेडकर यांनी केला होता.

आंबेडकरी अनुयायांनी गेल्या दोन दिवसांत आपण निवडणूक लढवावी, असा आग्रह धरला. अनेकांनी तर आत्मदहन करू, असा इशारा दिला. आंबेडकरी जनतेचा आक्रोश पाहून त्यांच्या भावनेचा आदर राखून आपण निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे, असे आनंदराज आंबेडकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. आज काँग्रेसचे अनेक नेते भाजपमध्ये जात आहेत. पण, आम्ही कधीही भाजपच्या भूलथापांना बळी पडणार नाही, असे ठामपणे सांगू शकतो. आज देशात लोकशाही धोक्यात आली आहे. अमरावती विभागाचे प्रश्न संसदेत प्रभावीपणे मांडण्यासाठी आणि आंबेडकरी विचारांच्या जनतेचे प्रतिनिधित्व करण्याच्या दृष्टीने आपली उमेदवारी आहे, असे आनंदराज आंबेडकर म्हणाले.

आपले कार्यक्षेत्र हे प्रामुख्याने मुंबई असले, तरी या भागातील प्रश्नांची आपल्याला जाण आहे. राहुल गांधी हे केरळमधून निवडणूक लढवू शकतात, तर मी अमरावतीतून का नाही, असा सवाल आनंदराज आंबेडकर यांनी केला. आंबेडकरी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी, राजकीय क्षेत्रातील काही लोकांची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी आपली उमेदवारी आहे. धर्मांध शक्ती डोके वर काढत असताना आता सर्व समाजाने एकत्र आले पाहिजे, असे आंबेडकर म्हणाले.

एकनाथ खडसेंची शरणागती तुरुंगवारी टाळण्यासाठीच, अजित पवार गटाच्या जळगाव जिल्हाध्यक्षांची टीका

जळगाव : राज्यातील मोठे नेते आमदार एकनाथ खडसे यांनी पुन्हा स्वगृही परतण्याचा निर्णय म्हणजे शरणागती पत्करली असून, तुरुंगवारी टाळण्यासाठीच ते घरवापसी करीत असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा बँकेचे अध्यक्ष संजय पवार यांनी केली आहे. शरद पवार यांना खडसे यांनी संकटकाळात धोका दिल्याचा आरोपही केला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते खडसे यांनी रविवारी १५ दिवसांत भाजपमध्ये प्रवेश करण्याचे जाहीर केले आहे. खडसे यांच्या या निर्णयावर अजित पवार गटाचे जळगाव जिल्हाध्यक्ष पवार यांनी टीका केली आहे. खडसे हे भाजपमध्ये जाणार असे ऐकले. एवढा मोठा माणूस आहे, एवढे मोठे नेते आहेत. खडसे हे राजकीय विजनवासात होते, त्यावेळी शरद पवार यांनी खडसेंना आसरा दिला, संकटकाळात विधान परिषदेचे

सदस्यत्वही बहाल केले. आता कोणतेही कारण नसताना ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत आहेत. शरद पवार यांना धोका देत आहेत. खडसे हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आल्यानंतर पक्षांतर्गत गटबाजी वाढल्याचे आपण वारंवार सांगितले होते. ते आल्यानंतर माजी मंत्री गुलाबराव देवकर यांचा गट वेगळा झाला. माजी मंत्री डॉ. सतीश पाटील व जिल्हाध्यक्ष ॲड. रवींद्र पाटील हे नाराज आहेत. खडसेंनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येऊन पक्षात वाद घडवून आणले. ॲड. रवींद्र पाटील आणि आमच्यातही खडसेंनी वाद लावले. जिल्हा बँकेत आमच्यात वाद लावले. सर्व समाजांमध्ये वाद लावण्याचा प्रयत्न खडसेंनी केला, असा आरोपही संजय पवार यांनी केला.

खडसे हे भाजपमधून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आले, कुणी त्यांच्यासोबत आले नाही. आता राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपमध्ये जाताहेत, तर त्यांच्यासोबत कुणीही जात नाही. खडसेंनी उद्धव ठाकरेंना फसवले, काँग्रेसला फसवले. आता शरद पवारांना फसवले. धोका दिला, गद्दारी केली, असेच म्हणावे लागेल. राजकीय घडामोडी पाहता, रक्षा खडसेंना थांबवून एकनाथ खडसेंना उमेदवार करतील, असे वाटते आहे. आता खडसे यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी भाजपची उमेदवारी करावी, असे आव्हानही पवार यांनी खडसेंना दिले. अजून पक्षप्रवेश झालेला नाही. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच राहावे, असा सल्लाही पवार यांनी दिला आहे.

आचारसंहितेमुळे महानगरपालिका रुग्णालयातील परिचारिकांची नियुक्ती रखडली

मुंबई : मुंबई महानगरपालिकेतील परिचारिका व डॉक्टरांना निवडणूक कामासाठी नियुक्ती करण्यात आले असून त्याचा परिणाम रुग्णसेवेवर होत आहे. तसेच मुंबई महानगरपालिकेमध्ये करण्यात येत असलेली परिचारिका आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती प्रक्रिया आचारसंहितेमध्ये अडकली आहे. परिचारिका आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र आचारसंहितेमुळे त्यांना नियुक्ती देता येत नसल्याने अडचण निर्माण झाली आहे.

मुंबई महानगरपालिकेमध्ये परिचारिका आणि प्रशासकीय कर्मचारी यांची भरती करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यानुसार राबविण्यात आलेल्या भरती प्रक्रियेतून ६५२ परिचारिकांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या परिचारिकांची पोलिस पडताळणी आणि शारीरिक क्षमता चाचणी पूर्ण झाली होती. त्यामुळे त्यांना लवकरच नियुक्ती पत्र देण्यात येणार होते. मात्र आचारसंहिता लागू करण्यात आल्याने ही नियुक्ती प्रक्रिया रखडली आहे. परिचारिकांप्रमाणेच प्रशासकीय कर्मचाऱ्यांचीही नियुक्ती प्रक्रिया रखडली आहे. अवघ्या १२ जणांना नियुक्ती पत्र दिल्याने ते कामावर रूजू झाले आहेत, मात्र आचारसंहितेमुळे उर्वरित निवड झालेल्यांना नियुक्ती पत्र देण्यात आलेली नाही, अशी माहिती मुंबई महानगरपालिकेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

कंत्राटी भरती करण्यासही परवानगी नाही

रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची निवडणूक कामासाठी नियुक्ती केली जात असल्याने रुग्णसेवेवर परिणाम होऊ नये यासाठी कंत्राटी पद्धतीने कर्मचारी भरण्याचा विचार महानगरपालिकेकडून करण्यात आला होता. मात्र आचारसंहितेमुळे कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात कर्मचारी भरती करण्यासही परवानगी नाकारण्यात येत असल्याचेही महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी सांगितले.

भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंचे निर्देश

‘अर्ज मागे घेऊन युतीधर्माचे पालन करा’ तर बंडखोर विजयराज शिंदे म्हणतात

बुलढाणा : बुलढाणा लोकसभेतील भाजप बंडखोर उमेदवार विजयराज शिंदे यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची त्यांच्या नागपूर येथील निवासस्थानी भेट घेतली. यावेळी झालेल्या बैठकीत बावनकुळे यांनी, अर्ज मागे घ्या, युतीधर्माचे पालन करा' असे कडक निर्देश दिले. दरम्यान आपण कार्यकर्त्यांशी चर्चा करून उद्या सोमवारी निर्णय घेणार असल्याचे शिंदे यांनी 'लोकसत्ता ' सोबत बोलताना सांगितले.

भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटे, चिखलीच्या आमदार श्वेताताई महाले पाटील या बैठकीत उपस्थित होते. यावेळी विजयराज शिंदे यांनी तक्रारींचा पाढाच वाचल्याचे वृत्त आहे. याशिवाय मंत्री गुलाब पाटील, आ. संजय गायकवाड यांच्या वादग्रस्त विधानांची माहितीही बावनकुळेंना दिली. आपल्याला विश्वासात घेतले जात नसल्याची तक्रार केली. बुलढाणा लोकसभा मतदारसंघात भाजपची ताकद जास्त असून ३ आमदार आहे. भाजपच्या पाठिंब्यावर मैत्रीपूर्ण लढतीची परवानगी द्यावी, अशी विनंती देखील शिंदेंनी बावनकुळे यांच्याकडे केली. मात्र, बावनकुळे यांनी युतीधर्म महत्वाचा असून, 'तुमच्या ज्यांच्याबद्दल तक्रारी आहेत त्यांना समज देऊ 'असा शब्द दिला. आपण भरलेला उमेदवारी अर्ज मागे घ्यावा, युतीधर्माचे पालन करून महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार करावा, अशा सूचना बावनकुळे यांनी विजयराज शिंदेंना केल्या.

तब्बल १ तास चाललेल्या या बैठकीतूनच चंद्रशेखर बावनकुळे यांनी फोनवरून संपर्क करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शिंदे यांचे म्हणणे सांगितले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही शिंदे यांची फोनवरून चर्चा झाली.

माघारीच्या अंतिम दिवशी फैसला

या संदर्भात उद्या, सोमवारी बुलढाण्यात कार्यकर्त्यांशी चर्चा करून अंतिम निर्णय घेऊ असे विजयराज शिंदे यांनी सांगितले. अर्ज मागे घेण्याची उद्या ८ एप्रिल ही अंतिम मुदत आहे. उद्या दुपारी ३ वाजेपर्यंत माघार घेता येणार आहे. यामुळे शिंदे माघार घेतात की बंडाचा झेंडा कायम ठेवतात? याकडे बुलढाण्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधले आहे.

‘एमपीएससी’ परीक्षांच्या सुधारित तारखा लवकरच; मागासवर्गाकरिता नव्याने आरक्षणनिश्चिती

नागपूर : सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण विचारात घेऊन नव्याने आरक्षणनिश्चिती केली जाणार आहे आणि सुधारित परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) प्रसिद्धिपत्रकाद्वारे कळविले आहे. विशेष म्हणजे, परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी असल्याचे वृत्त 'लोकसत्ता'ने प्रकाशित केले होते. आयोगाने याची दखल घेत लवकरच तारखा जाहीर होणार असे कळवले आहे.

पाच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांत हिस्सा-विक्री लवकरच; 'सेबी'च्या किमान सार्वजनिक भागधारणेच्या नियमाची पूर्ततेसाठी पावले

राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियमामधील तरतुदी २६ फेब्रुवारी २०२४ पासून लागू झाल्या. मात्र त्यापूर्वी जाहिरात प्रसिद्ध होऊन अर्ज मागविण्यात आलेले असून निवड प्रक्रिया सुरू झालेली नाही. अशा प्रकरणी शासनाकडून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण विचारात घेऊन नव्याने आरक्षणनिश्चिती करून घेणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना कळविण्यात आले आहे.

आयोगामार्फत महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करिता २९ डिसेंबर २०२३ रोजी विविध संवर्गातील २७४ पदांकरिता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. ही परीक्षा २८ एप्रिल २०२४ रोजी घेण्यात येणार होती; परंतु महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ अमलात आल्याने या अधिनियमातील तरतुदी विचारात घेता आयोगाच्या महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ तसेच समाजकल्याण अधिकारी, गट-ब आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. 'लोकसत्ता'ने मराठा आरक्षणाच्या निश्चितीसाठी परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे वृत्त प्रकाशित केले होते. यानंतर आयोगाने याची दखल घेत लवकरच तारखा जाहीर करण्याचे आश्वासन दिले.

सुधारित मागणीपत्राची प्रतीक्षा

सुधारित मागणीपत्र आयोगास प्राप्त होण्यास किती कालावधी लागेल याबाबत निश्चितता नसल्याने सध्या परीक्षेची सुधारित तारीख जाहीर करता येत नाही. प्रस्तुत परीक्षेतील सर्व संवर्गाकरिता प्रशासकीय विभागाकडून सुधारित मागणीपत्र प्राप्त झाल्यानंतर परीक्षेच्या पूर्वतयारीकरिता पुरेसा कालावधी देऊन परीक्षेचा सुधारित दिनांक आयोगामार्फत जाहीर करण्यात येईल, असे कळवण्यात आले आहे.

पाडव्यासाठीच्या साखर गाठी व्यवसायात गुजरातशी ‘गाठ’

छत्रपती संभाजीनगर : मराठी नववर्षातला पहिला सण आणि साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडव्याला मान असलेल्या साखरेच्या गाठी तयार करणे हा महाराष्ट्रातील काही घटकांचा पारंपरिक व्यवसाय असून, त्यांना आता गुजरातमधून येणाऱ्या गाठींशी स्पर्धा करावी लागत आहे. त्या स्पर्धेतून गाठीच्या बाजारपेठेत पारंपरिक शुभ्र गाठींसोबतच भगव्या, गुलाबी रंगांच्या गाठी व नगर जिल्ह्यात मागणी असलेला कंगनप्रकारही पाहायला मिळत आहेत.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पूर्वी साखरेचे हार (गाठी) बनविणारे कारागीर होते. मात्र अलीकडे व्यावसायिक गणिते नफ्याची करण्यासाठी कारागीर मंडळींनी आपला मोर्चा शहरांकडे वळविला. तेथे व्यवसायाची घडी बसली असतानाच आता त्यांची गाठ गुजरात राज्यातून येणाऱ्या साखरेच्या गाठींशी पडली.

भूम शहरातील रेवडकर कुटुंबीय तीन पिढ्यांपासून गाठी तयार करण्याच्या व्यवसायात असून त्यांच्याकडील गाठींना धाराशिवसह सोलापूर, लातूर, नगर, कल्याण, बीड, पुणे, मुंबई, बारामती या भागातून मोठी मागणी असते. व्यवसायाच्या संदर्भाने हेमंत रेवडकर, गणेश रेवडकर यांनी सांगितले, की या वर्षी बालगोपाळांना आकर्षित करण्यासाठी कंगन हार तयार केले आहेत. कंगन जोडीची किंमत ४० रुपये आहे. कंगन हा प्रकार नगर जिल्ह्यात अधिक प्रचलित आहे. तेथे लहान मुलांना होळीपासूनच कंगन दिले जाते. बांगडीमध्ये राणी-गुलाबी, लाल, पिवळा असे विविध आकर्षक रंग आहेत. त्याचा ठोक भाव ७० ते ७५ रुपये दर प्रतिकिलो आहे. किरकोळ दर ११५ ते १२० रुपये प्रतिकिलो आहे. या वर्षी ६५ ते ७० क्विंटल साखरेच्या हाराची विक्री होईल. गाठीच्या व्यवसायासाठी आवश्यक अपेक्षित मजूरवर्ग मिळत नाही. घरातीलच सदस्यांना गाठी तयार करण्याच्या कामामध्ये सहभागी करून घ्यावे लागते.

अलीकडच्या काळात गुजरातमधून मोठ्या प्रमाणात गाठी बाजारपेठेत येत आहेत. तेथे मोठ्या यंत्रांमधून गाठ्यांची निर्मिती केली जाते. आपल्याकडे साच्याच्या पारंपरिक पद्धतीतून गाठी बनवल्या जातात. गुजरातेतील गाठी अधिक शुभ्र दिसते, परंतु कालांतराने ती पिवळी पडते. आपल्याकडील गाठी वर्षभरानंतरही पिवळी पडत नाही. गुजरातमधील गाठींमध्ये काही रासायनिक द्रवाचे मिश्रण केले असण्याची शक्यता असू

देशातील पाणीसाठा ३५ टक्क्यांवर कुठे आहे सर्वाधिक बिकट स्थिती?

पुणे : गेल्या काही महिन्यांत पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. देशातील सरासरी पाणीसाठा ३५ टक्क्यांवर आला आहे. त्यात बिहारमध्ये फक्त सात टक्के, तर आंध्र प्रदेशात नऊ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे.

केंद्रीय जल आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, चार एप्रिलपर्यंतच्या आकडेवारीनुसार देशांतील मोठ्या १५० प्रकल्पांमध्ये एकूण पाणी साठवण क्षमतेच्या ३५ टक्के म्हणजे ६१.८०१ अब्ज घन मीटर पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी हा पाणीसाठा ७४.४७० अब्ज घन मीटर पाणीसाठा होता. देशभरात उन्हाच्या झळा वाढत आहेत. देशाचे सरासरी तापमान ३८ ते ४० अंशांवर गेले आहे. वाढत्या तापमानाबरोबर पाणीटंचाईही गंभीर होऊ लागली आहे. बिहार आणि आंध्र प्रदेश भीषण पाणीटंचाईचा सामना करीत आहेत.

दक्षिणेकडील राज्ये भीषण पाणीटंचाईचा सामना करीत आहेत. धरणांमध्ये फक्त २० टक्के म्हणजे १०.५७१ अब्ज घन मीटर पाणीसाठा असून, तो सरासरीच्या २८ टक्क्यांनी कमी आहे. आंध्र प्रदेशात ९ टक्के, तेलंगणात २५ टक्के, कर्नाटकात २२ टक्के, केरळात ४२ टक्के आणि तमिळनाडूत २४ टक्के पाणीसाठा आहे. उत्तरेकडील अन्य राज्यांच्या तुलनेत बिहार भीषण पाणीटंचाईचा सामना करीत आहे. बिहारमधील धरणांत अवघा सात टक्के पाणीसाठा आहे. बिहारमध्ये एकच मोठे धरण आहे. या धरणाची साठवण क्षमता ०.१३६ अब्ज घन मीटर आहे. सध्या या धरणात फक्त ०.००९ अब्ज घन मीटर पाणीसाठा आहे. हा पाणीसाठा सरासरीच्या ७८ टक्क्यांनी कमी आहे.

केंद्रीय जल आयोगाच्या माहितीनुसार, चार एप्रिल रोजी झारखंडमध्ये ६२ टक्के, मध्य प्रदेशात ५० टक्के, ओडिशात ४६ टक्के, छत्तीसगडमध्ये ४५ टक्के, त्रिपुरात ४३ टक्के, गुजरातमध्ये ४३ टक्के, केरळमध्ये ४२ टक्के आणि पंजाबमध्ये ४१ टक्के पाणीसाठा आहे. हा पाणीसाठा मोठ्या धरणांतील आहे. संबंधित राज्यांत झालेला अवकाळी पाऊस, स्थानिक पातळीवरील तलावांमधील पाण्याचा सिंचन आणि पिण्यासाठीचा वापर, भूजलाचा उपसा आदी कारणांमुळे मोठ्या धरणांतील पाणीसाठा सुरक्षित राहिला आहे.

राज्याच्या जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, रविवार, सात एप्रिल रोजी महाराष्ट्रातील धरणांतील पाणीसाठा ३५.८८ टक्क्यांवर आला आहे. औरंगाबाद विभागात सर्वांत कमी १८.३१ टक्के पाणीसाठा आहे, जो गेल्या वर्षी ४४.६८ टक्के होता.

बीडमधील प्रचाराला ‘राज’कन्या विरुद्ध ‘शेतकरी पुत्र’ लढतीचा रंग

छत्रपती संभाजीनगर : बीड लोकसभा मतदारसंघातील भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे व राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाचे बजरंग सोनवणे यांच्यातील लढतीला मराठा विरुद्ध ओबीसीसोबतच राजकारणतला वडील, मामापासून लाभलेला समृद्ध वारसा ते शेतकरी - त्यातही कुणबी पुत्र असाही रंग देण्याचा प्रयत्न होताना दिसतो आहे.

बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी गेवराईत नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाचे बीड लोकसभा मतदारसंघाचे निरीक्षक तथा राज्य परिवहन महामंडळाचे माजी अध्यक्ष जीवनराव गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत शेतकरी पुत्र उमेदवार रिंगणात असल्याचे ठरवण्यात आले. प्रचारात हाही मुद्दा केंद्रस्थानी ठेवून शेतकरी पुत्र म्हणजे कुणबी आणि कुणबी हा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामागील अन्वयार्थ पाहिला तर तो मराठा या जातविषयक शब्दाभोवती फिरणारा आहे. या बैठकीला माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी आमदार उषा दराडे यांच्यासह महाआघाडीतील अनेक मान्यवर उपस्थित होते.

पंकजा या राज कन्या घराण्यातून आलेल्या आहेत. त्यांचे वडील दिवंगत गोपीनाथ मुंडे हे राज्याचे विरोधी पक्षनेते ते उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, ऊर्जामंत्री, दोनवेळा खासदार, अल्पकाळ केंद्रात ग्रामविकास मंत्री,

तर मामा प्रमोद महाजन हे केंद्रीय स्तरावरील राजकारणातले बडे प्रस्थ होते. आताही पंकजा मुंडे यांचे मामा प्रकाश महाजन हे मनसेचे नेते आहेत आणि तेही परवा पंकजा यांच्या संपर्क कार्यालयाच्या उद्घाटनाला आवर्जून उपस्थित राहिले होते. शिवाय पंकजा मुंडे यांना भाजपमधील राजकारणात बाजूला ठेवून त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न होत असताना प्रकाश महाजन यांनी पंकजा यांची बाजू घेत आक्रमकपणे भाजपवर टीका केली होती. स्वतः पंकजा मुंडे यांनी राज्यात महिला व बालविकास व ग्रामविकास मंत्री म्हणून कामकाज पाच वर्षे सांभाळले आहे. असा राजकीय समृद्ध वारसा लाभूनही पंकजा मुंडे यांना वडिलोपार्जित वैद्यनाथ साखर कारखाना चालवता आला नाही. म्हणजे त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नाशी काही देणे घेणे नसून १० लाख रुपयांची लाच घेताना वैद्यनाथ बँकेच्या माजी अध्यक्षांना पकडण्यात आल्यामुळे सहकार क्षेत्र चालवण्यात त्यांचे नेतृत्व कमी पडल्याची टीका राष्ट्रवादीकडून करण्यात येत आहे. कुणबी, शेतकरी पुत्र, यशस्वीपणे दोन साखर कारखाने चालवणारे बजरंग सोनवणे हे कुठलाही राजकीय वारसा नसलेले शेतकरी, सर्व सामान्यांना जवळचे वाटावे, असे उमेदवार असल्याचा प्रचार केंद्रस्थानी ठेवण्याचा प्रयत्न शरद पवार गटाकडून सुरू आहे.

पारंपरिक लढ्यातील मतांची टक्केवारी कशी होती ?

२०१९ मध्ये डॉ. प्रीतम मुंडे यांना ५०.११ टक्के मतदान मिळाले होते तर बजरंग सोनवणे यांना ३७.६७ टक्के मते मिळाली होती. तत्पूर्वी म्हणजे २०१४ मध्ये त्यांच्या मताची टक्केवारी ७०.२४ टक्के एवढी होती. २००४ मधील लोकसभा निवडणुकीचा अपवाद वगळता १९९६ पासून हा मतदारसंघ भाजपच्या ताब्यात आहे. तर २००४ मध्ये जयसिंग गायकवाड पाटील या मतदारसंघातून राष्ट्रवादीच्या तिकिटावर निवडून आले होते. १९७७ साली मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे गंगाधर अप्पा बुरांडे निवडणून आले होते. १९८९ मध्ये जनता दलाकडून बबनराव ढाकणे हेही बीडचे खासदार होते. पुढे मात्र, गोपीनाथ मुंडे यांनी हा मतदारसंघ बांधला. या मतदारसंघाचे केशरकाकू क्षीरसागर यांनी दोनदा नेतृत्व केले.

काश्मीरमध्ये जी दगडफेक केली त्याच दगडांनी

विकसित जम्मू-काश्मीरची उभारणी करतोय : पंतप्रधान मोदी

सहारनपूर : भारताला मजबूत देश बनवणे ही भाजपाची वचनबद्धता आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले आहेत. भाजपाच्या हेतूनुसार, निष्ठेनुसार धोरणंही तशीच बनवली जातात. त्यामुळेच आज प्रत्येक भारतीय अनुभवातून सांगत आहे की, हेतू बरोबर असतील तर परिणाम योग्यच असतात. तसंच, भाजपा सरकार भेदभाव न करता काम करतं. शासनाच्या योजना प्रत्येक वर्ग, प्रत्येक जाती, प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, हा आमचा विचार आहे. त्यामुळे भाजपा सरकारने १० वर्षे पूर्ण ताकदीने काम केले आहे. भाजपा देशातील प्रत्येक नागरिकाच्या समस्या कमी करत आहे. प्रत्येकासाठी नवीन संधी निर्माण करणं हे आपलं काम असल्याचं मोदी म्हणाले. सहारनपूरचे लाकूड कोरीव काम आणि तेथील लोकांचे कौशल्य दूरवर प्रसिद्ध आहे. त्यामुळे योगी असो वा मोदी, आम्हाला तुमची काळजी आहे. म्हणूनच आम्ही दोघंही एकच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगतो 'व्होकल फॉर लोकल' असेही पंतप्रधान मोदी यावेळी म्हणालेत.

'मेहनतीत कोणतीही कसर ठेवली नाही' : ''१० वर्षापूर्वी मी सहारनपूरला निवडणूक रॅलीसाठी आलो होतो. त्यावेळी देश प्रचंड निराशेच्या आणि संकटाच्या काळातून जात होता. तेव्हा मी तुम्हाला हमी दिली होती की, मी देश झुकू देणार नाही, देश थांबू देणार नाही. मी संकल्प केला होता की तुमच्या आशीर्वादाने मी प्रत्येक परिस्थिती बदलेन, निराशेला आशेत बदलेन. तुम्ही तुमच्या आशीर्वादात कोणतीही कसर ठेवली नाही आणि मोदींनी त्यांच्या मेहनतीत कोणतीही कसर ठेवली नाही असा दावाही मोदींनी यावेळी उपस्थितांसमोर केला आहे.

शक्ती कोणी संपवू शकेल का : शक्तीशी लढण्याच्या वक्तव्यावरून विरोधकांवर निशाणा साधत पंतप्रधान मोदी म्हणाले, आमचं हे स्थान मातृशक्तीचं स्थान आहे. आमचं हे स्थान मातृशक्तीचं पूजन आहे आणि भारताच्या कानाकोपऱ्यात शक्तीची उपासना ही आमची नैसर्गिक गोष्ट आहे. आध्यात्मिक प्रवासाचा एक भाग आहे. आपण तो देश आहोत जो शक्तीपूजेला कधीही नाकारत नाही. पण इंडी अलायन्सचे लोक आपला लढा शक्तीविरुद्ध असल्याचे उघड आव्हान देत आहेत, हे देशाचे दुर्दैव आहे. शक्ती कोणी संपवू शकेल का? ताकदवानांना कोणी आव्हान देऊ शकेल का? ज्यांनी शक्ती नष्ट करण्याचा प्रयत्न केला त्या सर्वांच्या नशिबी इतिहासात आणि पुराणात नोंद आहे असंही मोदी यावेळी मोदी म्हणाले.

बंगालच्या उपसागरात आंध्र किनारपट्टीवर नऊ जखमी मच्छिमारांची केली सुटका

बंगाल : आंध्र किनारपट्टीवर गस्तीवर असलेल्या भारतीय तटरक्षक जहाज ''वीरा'' ने तातडीने पाऊले उचलत नऊ मच्छिमारांना वाचवले.५ एप्रिल २०२४ रोजी बोटीला आग लागल्याने हे मच्छिमार गंभीर जखमी झाले होते. आगीनंतर या बोटीला जलसमाधी मिळाली होती.

आयसीजीएस वीरा ला विशाखापट्टणम बंदरापासून सुमारे ६५ आणि नॉटिकल मैल अंतरावर असलेल्या भारतीय मासेमारी नौका (आयएफबी) दुर्गा भवानीला आग लागल्याचा जवळच्या मासेमारी बोटीकडून रेडिओ संदेश मिळाला होता. आयएफबी दुर्गा भवानी ही आंध्र नोंदणीकृत बोट २६ मार्च २०२४ रोजी काकीनाडा बंदरातून नऊ कर्मचाऱ्यांसह निघाली होती. ५ एप्रिल रोजी बोटीला आग लागल्याने जहाजावरील गॅस सिलिंडरचा स्फोट झाला होता. सर्व नऊ मच्छिमारांनी जीव वाचण्यासाठी पाण्यात उडी मारली परंतु काहींना गंभीर दुखापत झाली. स्फोटामुळे नुकसान झालेली मासेमारी बोट काही मिनिटांतच त्या ठिकाणी बुडाली. आग आणि स्फोटाची माहिती जवळच्या बोटीद्वारे तटरक्षक दलाच्या जहाजाला देण्यात आली.

परिस्थितीची निकड ओळखून आयसीजीएस वीरा वेगाने पुढे निघाले आणि वाचलेल्यांना मदत देण्यासाठी काही तासांतच त्या ठिकाणी पोहोचले. सर्व नऊ जणांना तटरक्षक दलाच्या जहाजात हलवण्यात आले तिथे वैद्यकीय पथकाने त्यांच्यावर तातडीने प्रथमोपचार केले.

दरम्यान, तटरक्षक दलाच्या जिल्हा मुख्यालय क्रमांक ६ ने जेडी फिशरीज विशाखापट्टणम यांच्या समन्वयाने आयएफबी च्या गंभीर जखमी कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यासाठी वैद्यकीय पथकांसह रुग्णवाहिकांची तातडीने व्यवस्था केली. सर्व जखमी मच्छिमारांना पुढील उपचारासाठी विशाखापट्टणम येथील किंग जॉर्ज रुग्णालयात हलवण्यात आले.

आयसीजी जहाजाने दिलेल्या जलद प्रतिसादामुळे संपूर्ण बचाव मोहीम सहा तासांच्या अल्प कालावधीत पूर्ण झाली.

भारतीय तटरक्षक दल ही समुद्रातील मच्छिमारांना मदत पुरवणारी प्रमुख संस्था आहे तसेच समुद्रात शोध आणि बचाव कार्यासाठीची राष्ट्रीय समन्वय संस्था आहे.

भारतीय तटरक्षक दलाने केलेल्या संयुक्त कारवाईत तामिळनाडूतील मंडपम किनाऱ्यावर ४.९ किलोग्राम विदेशी सोने केले जप्त

तामिळनाडू : भारतीय तटरक्षक दल आणि रामनाथपुरम येथील सीमाशुल्क विभागाच्या प्रतिबंधक युनिट (सीपीयु) यांच्या संयुक्त कारवाईत, महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) तामिळनाडूमधील मंडपमजवळ वेधलाई किनारपट्टी येथील मध्य समुद्रात ४.९ किलो विदेशी सोने जप्त केले.

मासेमारी बोटीचा वापर करून एका टोळीद्वारे रामनाथपुरम जिल्ह्यातील वेधलाई किनाऱ्यावरून श्रीलंकेतून विदेशी सोन्याची भारतात तस्करी केली जात असल्याची गुप्त माहिती डीआरआयच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यानुसार, डीआरआय आणि भारतीय तटरक्षक दलाच्या (आयसीजी) अधिकाऱ्यांनी ३-४ एप्रिलच्या मध्यरात्री मंडपमजवळील वेधलाई किनारपट्टी भागात संशयित मासेमारी नौकांच्या हालचालींवर पाळत ठेवली. ४ एप्रिलच्या पहाटे, अधिकाऱ्यांनी मध्य समुद्रात एका संशयित बोटीचा तटरक्षक दलाच्या जहाजातून पाठलाग केला आणि ती बोट अडवली. त्यांना अडवण्याच्या आधीच संशयित बोटीवरील एका व्यक्तीने काही माल समुद्रात टाकला होता,असे अधिकाऱ्यांच्या लक्षात आले.

या देशी बोटीवर तीन जण होते आणि चौकशीदरम्यान त्यांनी समुद्रात टाकलेल्या मालामध्ये श्रीलंकेतून तस्करी केलेल्या विदेशी सोन्याचा समावेश असल्याचे कबूल केले आणि ते श्रीलंकेच्या खोल समुद्रात एका बोटीतून त्यांना मिळाले होते.

दरम्यान, सीपीयू रामनाथपुरमचे अधिकारीही एका बोटीत बसले आणि ज्या ठिकाणी तस्करीचे सोने समुद्रात फेकले गेले ते ठिकाण शोधून तिथे शोध मोहीम सुरू करण्यात आली. ५ एप्रिल रोजी दुपारी, समुद्राच्या तळापर्यंतच्या व्यापक शोध मोहिमेनंतर तस्करीचे सोने परत मिळवण्यात आले. त्यात ३.४३ कोटी रुपये किमतीच्या ४.९ किलो वजनाच्या वेगवेगळ्या आकाराच्या कच्च्या सोन्याच्या पट्ट्या एका टॉवेलमध्ये घट्ट बांधल्या होत्या आणि ते नजरेत येऊ नये म्हणून समुद्रात फेकल्या गेल्या होत्या. डीआरआय अधिकाऱ्यांनी ४.९ किलो विदेशी तस्करीचे सोने जप्त केले असून तीनही आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांची चौकशी सुरू आहे.

समृद्धी महामार्गावर भरधाव कारची कंटेनरला धडक!

नागपूर : समृद्धी महामार्ग नेहमी अपघात होत असल्याचे समोर आलं आहे. या महामार्गावर अपघाताचं सत्र सुरूच आहे. विकासाचा मार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समृद्धी महामार्गावरील अपघातांच्या घटना काही थांबत नसून आज पुन्हा एक अपघात झाल्याची घटना समोर आली आहे.

समृद्धी महामार्गावर उभ्या असलेल्या कंटेनरला भरधाव कारने धडक दिल्याची घटना घडली आहे. समृद्धी महामार्गावर हडस पिपंळगाव जवळील टोल नाक्याजवळ हा अपघात झाला आहे. मात्र सुदैवाने या अपघातात कोणतीही जिवितहानी झालेली नाही. घटनास्थळी मदत कार्यासाठी नागरिक धावून आले होते.

समृद्धी महामार्गावर सतत होणाऱ्या अपघातामुळे सुविधा आणि सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. तसेच अपघाताच्या घटना थांबाव्या म्हणून विविध उपाययोजना करण्यात येत आहे.

अशा लोकांचे 'राम नाम सत्य' करतो'', योगी आदित्यनाथ यांनी कुणाला दिला सज्जड इशारा?

अलीगढ : उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सामाजिक वातावरण बिघडवणाऱ्यांना सज्जड इशारा दिला आहे. जे लोक सामाजिक सौहार्दाला धक्का लावतील त्यांचे 'राम नाम सत्य' केले जाईल, असे ते म्हणाले. शुक्रवारी अलीगढ येथील एका जाहीर सभेत बोलत असताना त्यांनी हा इशारा दिला. अलीगढमध्ये भाजपाने सतीश कुमार गौतम यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल रोजी याठिकाणी मतदान होणार आहे. गौतम यांच्या प्रचारासाठी आयोजित केलेल्या सभेत योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशच्या कायदा व सुव्यवस्थेबाबत भाष्य केले.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ पुढे म्हणाले, उत्तर प्रदेशमध्ये महिला आणि व्यापारी रात्रीच्या वेळी कधी सुरक्षितपणे घराबाहेर पडू शकतील, असा विचार कुणीही केला नव्हता. काही वर्षांपूर्वीपर्यंत लोक विचार करायचे की, गुन्हेगारांना काहीही होणार नाही. पण याच गुन्हेगारांना त्यांचे आयुष्य नकोसे करून टाकू, असा शब्द मी दिला होता. आम्ही कमी बोलतो आणि जास्त काम करतो, असेही ते सांगायला विसरले नाहीत.

''आम्ही फक्त प्रभू रामालाच आणले नाही तर जे लोक मुली आणि व्यापाऱ्यांसाठी धोका बनले होते, त्यांचे 'राम नाम सत्य' करण्यासाठी मागेपुढे पाहत नाहीत. आम्ही रामाचे नाव घेऊन जीवन जगतो. प्रभू रामाला वगळले तर काहीच शक्य नाही. पण ज्यावेळी कुणी समाजात दहशत निर्माण करतो, त्यावेळी त्याचे राम नाम सत्य केल्याशिवाय आम्ही राहत नाही'', असे योगी आदित्यनाथ आपल्या भाषणात म्हणाले.

मतदानाबाबत आवाहन करताना योगी आदित्यनाथ म्हणाले की, लोकशाहीमध्ये मतदानाचे फार महत्त्व आहे. तुम्ही चुकीच्या उमेदवारासमोरील बटण दाबले तर देश भ्रष्टाचाराच्या दरीत ढकलला जाऊ शकतो. उत्तर प्रदेशमध्ये याआधी अराजक, कायदा व सुव्यवस्थेचा अभाव आणि कर्फ्यू सारखी परिस्थिती असायची. महिला आणि तरूण मुले नेहमी दहशतीत असायचे. पण १० वर्षापूर्वी लोकांनी जे स्वप्न पाहिले होते, ते केवळ योग्य मतदानामुळे आता सत्यात उतरत आहे.

उत्तर प्रदेशचा जेव्हा विकास होईल, तेव्हाच भारताचा विकास होईल आणि अलीगढचा विकास झाला तरच उत्तर प्रदेशचा विकास होईल, त्यामुळे मतदानाच्या दिवशी लोकांनी विकासासाठी मतदान करावे, असे आवाहन योगी आदित्यनाथ यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची काँग्रेसवर टीका; म्हणाले, ''जाहीरनाम्यावर मुस्लीम लीगची

दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने ५ एप्रिल रोजी जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यात काँग्रेसकडून मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. या जाहीरनाम्यात अग्निवीर योजना बंद करून जुन्या पद्धतीने भरती राबविण्याचे आश्वासनासह तीस लाख युवकांना सरकारी नोकरी देण्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, काँग्रेसच्या या जाहीरनाम्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टीका केली आहे. ''काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर मुस्लिम लीगची छाप आहे'', असा हल्लाबोल पंतप्रधान मोदी यांनी केला. ते उत्तर प्रदेशमधील भाजपाच्या रॅलीला संबोधित करत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी काय म्हणाले?

''पहिली काँग्रेस आता राहिलेली नाही. लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यावर मुस्लिम लीगची छाप असल्याचे दिसून येते. तसेच जाहीरनाम्याचा काही भागावर डाव्या विचारसरणीचा प्रभाव दिसतो आहे. काँग्रेस ज्या उमेदवाराला तिकीट देते तो उमेदवार दुसऱ्या दिवशी काँग्रेस सोडत आहे. आज उरलेल्या काँग्रेसकडे राष्ट्रहिताची काहीच धोरणे नाहीत. देशाच्या विकासासाठी काही धोरणदेखील नाही'', असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

''महात्मा गांधी यांच्यासह अनेक महान व्यक्ती काँग्रेसबरोबर जोडले गेले होते. मात्र, स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी अस्तित्वात असलेली काँग्रेस दशकापूर्वीच संपली आहे. आता जी काँग्रेस राहिली, त्यांच्याकडे देशाच्या हितासाठी काहीही नाही. काँग्रेसने कधीही वंचित, शोषितांचा विचार केला नाही'', असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज उत्तर प्रदेशमच्या सहारनपूर येथे भव्य रॅली पार पडली. यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, ''काँग्रेसने बालेकिल्ला म्हणून मानलेल्या अमेठी आणि रायबरेली या मतदारसंघातदेखील काँग्रेस उमेदवार उभे करण्याचे धाडस दाखवू शकत नाही'', असा टोला पंतप्रधान मोदी काँग्रेसला लगावला.

काँग्रेसची वाटचाल मुस्लिम लीगच्या दिशेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उत्तर प्रदेशातील सभेत जोरदार टीका

लखनौ : एका बाजूला विकसित भारताच्या मिशनने भारलेले भाजपाचे कार्यकर्ते आणि दुसरीकडे कमिशनवर डोळा ठेवून केवळ सत्तेसाठी तळमळणारे काँग्रेसचे नेते अशी एक लढाई या लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने सुरू झाली असून एनडीएला ४०० जागांचा टप्पा पार करून प्रचंड विजय मिळेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी व्यक्त केला. काँग्रेसची वाटचाल स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच्या मुस्लिम लीग च्या दिशेने सुरु असल्याची टीकाही त्यांनी केली.उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथे भाजपाच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित प्रचंड जाहीर सभेत बोलताना पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसच्या राजकारणावर सडकून टीका केली. काँग्रेस जितकी वर्षे सत्तेत राहिली, त्यांनी कमिशन घेण्यालाच प्राधान्य दिले. इंडी आघाडी कमिशनसाठी धडपडत आहे, तर एनडीए सरकार आणि मोदी सरकार विकासाचे मिशन पूर्ण करण्यासाठी धडपडत आहे, असे ते म्हणाले. १० वर्षात २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले आहेत. काँग्रेसची सरकारे जे अनेक दशकांत करू शकले नाहीत ते भाजपाने १० वर्षात करून दाखवले आहे. त्यामुळे ४ जूनपर्यंत ४०० जागांचा टप्पा ओलांडू, असे केवळ आम्ही नाही, तर सारा देश म्हणत आहे, असेही ते म्हणाले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, हरियाणाचे मुख्यमंत्री श्री नायब सिंह सैनी आणि उत्तराखंडचे मुख्यमंत्री श्री पुष्कर सिंह धामी व अन्य भाजपा नेते याप्रसंगी उपस्थित होते.

मी देशाला झुकू देणार नाही, मी प्रत्येक परिस्थिती बदलेन, मी निराशेचे आशेत रूपांतर करेन, मी आशेचे विश्वासात रूपांतर करेन, अशी ग्वाही मी २०१४ मध्ये सत्ताग्रहण करताना देशाला दिली होती, याचे स्मरण करून देत पंतप्रधान मोदी म्हणाले की,तुम्ही तुमच्या आशीर्वादात कोणतीही कसर सोडली नाही. मोदींनी आपल्या मेहनतीत कोणतीही कसर सोडली नाही. त्या वेळी आपला भारत जगातील ११ वी आर्थिक शक्ती होता. मोदींनी १० वर्षात भारताला पाचवी जागतिक महासत्ता बनवले. आता जगात भारताचा उदोउदो होत आहे. युरोपात, अमेरिका आणि आफ्रिकेतही भारताचा उदोउदो होत आहे. भारताचे नाव जगात दुमदुमत आहे, आणि पुन्हा मोदी सरकारच येणार असा आवाज देशात चहुबाजूंनी दुमदुमत आहे. २०२४ ची निवडणूक ही केवळ सरकार स्थापन करण्याची निवडणूक नाही, तर ही निवडणूक विकसित भारत घडवण्याची आहे, अशा शब्दांत पंतप्रधान मोदी यांनी विकासाच्या संकल्पाचा पुनरुच्चार केला, तेव्हा उपस्थित प्रचंड जनसमुदायाने मोदीनामाचा गजर करत त्यास जोरदार प्रतिसाद दिला. यावर्षी रामनवमीला आपले प्रभू श्रीराम मंडपात नाही तर भव्य मंदिरात दर्शन देणार आहेत ही आमच्या पिढीसाठी अभिमानाची गोष्ट आहे. काश्मीरमधून कलम ३७० हटवणे हे आमचे ध्येय होते. हे ध्येय पूर्ण झाले आहे. काश्मीरमध्ये दगडफेक करणाऱ्यांनी फेकलेले दगड उचलूनच मोदी सरकार विकसित जम्मू-काश्मीरची उभारणी करत आहे. विकास हा भाजपाचा हेतू आणि विकसित भारत ही भाजपाची वैचारिक निष्ठा आहे आणि त्यानुसारच धोरणात्मक वाटचाल सुरू आहे.

आज जी काँग्रेस उरली आहे, तिच्याकडे कोणतेही धोरण नाही. काल काँग्रेसने ज्या प्रकारचे घोषणापत्र (जाहीरनामा) प्रसिद्ध केले, त्यावरून आजची काँग्रेस भारताच्या आकांक्षांपासून दूर असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य चळवळीवेळी जी विचारसरणी मुस्लिम लीगची होती, तीच विचारसरणी त्यांच्या जाहीरनाम्यात दिसून येते. काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर मुस्लिम लीग आणि काही प्रमाणात डाव्यांचे वर्चस्व आहे. काँग्रेस दूर-दूरपर्यंत दिसत नाही, याकडेही पंतप्रधान मोदी यांनी देशाचे लक्ष वेधले.भ्रष्टाचारी लोक गरीबांची स्वप्ने हिरावून घेतात. अधिकार मर्यादित करतात. तुमचा मुलगा नोकरीसाठी पात्र ठरला आणि त्याच्या जागी दुसऱ्याला नोकरी दिली तर तुमचे काय होईल? मी तुमच्या मुलाच्या भविष्यासाठी शिव्या खात आहे. भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी ते रॅली, मोर्चे काढत आहेत. मला विश्वास आहे की, तुम्ही भाजपा आणि एनडीएला प्रचंड बहुमताने विजयी कराल, अशा शब्दांत मोदी यांनी भाषणाचा समारोप केला, तेव्हा अवघे सभास्थान मोदी यांच्या विजय घोषणांनी दुमदुमत होते.

मागच्या पाच वर्षात चीनने लडाखचा बराच भूभाग गिळंकृत केला

सोनम वांगचुक यांचा सरकारवर आरोप

दिल्ली : केंद्रशासित प्रदेश असलेल्या लडाखमध्ये कलम १४४ लागू करण्यात आले आहे. यामुळे चार किंवा त्यापेक्षा अधिक लोकांना एकत्र जमण्यास विरोध करण्यात आले आहे. शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी ७ एप्रिल रोजी चीनच्या सीमेच्या दिशेने मोर्चाचे आयोजन केले आहे. याशिवाय लेह-लडाखमध्ये पुढच्या २४ तासांसाठी इंटरनेटचा स्पीड २जी पर्यत प्रतिबंधित केला आहे. सोनम वांगचुक यांनी विविध मागण्यांसाठी २१ दिवसांचे उपोषण केले होते. त्यानंतर त्यांनी आता पश्मीना मोर्चाची घोषणा केली असून चीनच्या सीमेवर जाण्याचा निर्णय घेतला आहे. या मोर्चात लडाखचे १० हजार लोक सहभागी होतील, असेही वांगचुक यांनी सांगितले आहे.

या मोर्चाबद्दल माहिती देताना वांगचुक म्हणाले की, एका बाजुला भारतीय कॉर्पोरेट कंपन्या लडाखची जमीन बळकावत आहेत. जवळपास दीड लाख चौरस किलोमीटर कुरण असलेली जमीन बळकावण्यात आली आहे. तर दुसऱ्या बाजुला चीन भारतीय भूभाग गिळंकृत करत आहे. मागच्या पाच वर्षात चीनने भारतातील जमीन मोठ्या प्रमाणात ताब्यात घेतली आहे. ही जमीन चरण्यासाठी कुरण म्हणून वापरली जात होती. पण केंद्र सरकार याकडे कानाडोळा करत असून ही बाबा देशापासून लपवत आहे, असा आरोप वांगचुक यांनी केला.

मोर्चाबद्दल सांगताना वांगचुक म्हणाले, ''चीनचे सैनिक भारतीय गुराख्यांना आता भारतीय भूभागात जाण्यापासूनही रोखत आहेत. या मोर्चाच्या माध्यमातून वांगचुक यांना दाखवायचे आहे की, याआधी लडाखमधील गुराखी किती दूर जात होते आणि आता किती अंतरापर्यंत ते जाऊ शकतात.'' सीमारेषेवर जाणाऱ्या या मोर्चाचा धसका प्रशासनाने घेतला असून मोर्चात लोकांनी सहभागी होऊ नये, असा प्रयत्न केला जात आहे. आता कलम १४४ लागू केल्यामुळे लेह जिल्हाधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीशिवाय मिरवणूक, मोर्चा काढता येणार नाही.

जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे की, सामाजिक सौहार्द किंवा शांतता भंग होईल, असे विधान कुणीही करू नये. जर शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला तर कायदा आणि सुव्यवस्थेला धक्का मानला जाईल. या आदेशात निवडणूक आयोगाच्या आदर्श आचारसंहितेचाही उल्लेख करण्यात आला आहे.

वांगचुक यांच्या मागण्या काय आहेत?

सोमन वांगचुक यांनी मार्च महिन्यात २१ दिवसांचे उपोषण करून विविध मागण्या केल्या होत्या. त्यापैकी सध्या केंद्रशासित प्रदेश असलेल्या लडाखला राज्यघटनेतील सहाव्या परिशिष्टानुसार लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा, लडाखमध्ये सध्या लोकसभेची एक जागा आहे, त्या दोन कराव्यात. राज्यसभेत प्रतिनिधित्व मिळावे आणि लडाखमध्ये लोकसेवा आयोगाची स्थापना करावी, या वांगचुक यांच्या प्रमुख मागण्या आहेत.

केंद्र सरकारने शब्द पाळला नाही?

केंद्र सरकारने ५ ऑगस्ट २०१९ रोजी कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू-काश्मीर आणि लडाख, या दोन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती केली. लडाखला स्वतंत्र अस्तित्व मिळाले. पण त्यापूर्वी जम्मू-काश्मीरचा भाग म्हणून असलेला विशेष दर्जा संपला. कलम ३७० रद्द करताना लडाखला राज्यघटनेच्या सहाव्या परिशिष्टानुसार संरक्षण दिले जाईल, असा शब्द तत्कालीन केंद्र सरकारने दिला होता. भाजपने २०१९च्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यातही लडाखला स्वतंत्र दर्जा देण्याचे आश्वासन दिले होते. मागील वर्षी झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही पुन्हा तेच आश्वासन दिले गेले. पण ना हे आश्वासन पूर्ण केले गेले, ना त्या दिशेने ठोस पावले टाकली गेली. आता तर लेहमध्ये सहावे परिशिष्ट असा शब्द उच्चारणाऱ्यांवर दडपशाही केली जाते, असा आरोप वांगचुक करीत आहेत.

पश्चिम बंगालमध्ये 'एनआयए'च्या पथकावर हल्ला; वाहनांची तोडफोड, दोन अधिकारी जखमी

भूपतीनगर : पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) पथकावर हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. एनआयएच्या पथकावर जमावाकडून अचानक दगडफेक करण्यात आली. तसेच पथकातील वाहनांची तोडफोड करण्यात आली. यामध्ये एनआयएच्या पथकातील दोन अधिकारी किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. या प्रकारामुळे पश्चिम बंगालमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

नेमके प्रकरण काय ?

डिंसेबर २०२२ च्या भूपतीनगर बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास करण्यासाठी राष्ट्रीय तपास यंत्रणेचे एक पथक या ठिकाणी दाखल झाले होते. या बॉम्बस्फोट प्रकरणात तीन जणांचा मुत्यू झाला होता. यासंदर्भातील तपास एनआयएकडून सुरु असून यासाठी भूपतीनगर येथे आलेल्या पथकावर संतप्त जमावाकडून हल्ला करण्यात आला. यावेळी दगडफेक करत अधिकाऱ्यांच्या वाहनांची तोडफोड करण्यात आली. ही घटना ६ एप्रिल रोजी पहाटे घडली. या घटनेत दोन अधिकारी जखमी झाले आहेत.

पथकावर हल्ला झालेल्या प्रकरणात पोलिसांनी काहींना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. भूपतीनगर बॉम्बस्फोट प्रकरणात तृणमूल काँग्रेसच्या आठ नेत्यांची चौकशी सुरु आहे. या प्रकरणात काहींना नोटीसा देण्यात आल्या होत्या. मात्र, ते चौकशीसाठी हजर झाले नव्हते. त्यानंतर एनआयएचे पथक त्यांना ताब्यात घेण्यासाठी दाखल झाले असता त्यांच्यावर जमावाने हल्ला केला.

पश्चिम बंगालमध्ये याआधी एकदा ईडीच्या पथकावर हल्ला झाल्याचा प्रकार घडला होता. पश्चिम बंगालच्या संदेशाखाली भागात ईडीच्या पथकावर हल्ला झाला होता. यावेळी १०० हून अधिक जणांच्या जमावाने हल्ला केला होता. या हल्ल्यामागे तृणमूल काँग्रेसचे माजी नेते शेख शाहजहान हे असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांना २९ फेब्रुवारी रोजी बंगाल पोलिसांकडून अटक करण्यात आली होती.